# जाहिरात नमुना सन २०१९-२०

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे परिमंडळ, पुणे.

पुणे परिमंडळांतर्गत **राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत एसटीडीसी पुणे व जिल्हा क्षयरोग केंद्र पुणे** करीता रिक्त पदांची भरती प्रक्रिया खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर पदभरती करणेसाठी खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज http://ddhspune.com/ या लिंकवरती मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ७ | M.Sc Medical microbiology/ Applied Microbiology/ Chemistry/General Microbiology/Clinical Microbiology/Biotechnology/ Medical Biotechnology (3 Years of work experience in Bacteriology)<br>or<br>B.Sc Microbiology/Biotechnology/ Biochemistry/Chemistry/Life Science with or without DMLT (5 years of work experience in Bacteriology) | ३८ वर्ष खुला प्रवर्ग, ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | रु. २५,०००/- | अजा १<br>अज १<br>वि.जा.(अ) १<br>इ.मा.व. १<br>एस.ई.बी.सी. १<br>खुला २ |

**अटी व शर्ती :-**

१) इच्छुक उमेदवारांनी दि. १७/०८/२०२० ते २६/०८/२०२० रोजी सायं.५.०० वाजेपर्यत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा. अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) ५) शासकिय/निमशासकिय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ६) निवासी पुरावा ७) जातीचे प्रमाणपत्र ८) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह सोबत जोडलेल्या ऑनलाईन लिंक http://ddhspune.com/ वर जाऊन अर्ज सादर करावा.

२) उपरोक्त पदांसाठी उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरीता अपेक्षित उमेदवार उपलब्ध न झाल्यास एन.एच.एम अंतर्गत व्यवस्थापनाकरीता सदरील पदे भरणे आवश्यक असल्याने उक्त शैक्षणिक अर्हताधारक शासकिय सेवानिवृत्त उमेदवार हे सदर पदाकरीता पात्र राहतील.

३) सदरचे पदे ११ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर भरण्यात येणार आहेत.

४) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

५) ऑनलाईनद्वारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करताना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण उच्च शैक्षणिक अर्हता व शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

६) मेरीट लिस्ट तयार झाल्यानंतर ती www.nhm.maharashtra.gov.in & www.arogya.maharashtra.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येईल.



Scanned with CamScanner

७) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

८) पुर्ननियुक्तीबाबत,शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

९) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मुख्यालयी राहुन सेवा देणे बंधनकारक राहील.

१०) मुलाखत होणार नसल्याने तसेच पदभरतीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवु नये. तसेच उपसंचालक कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

११) अर्जदारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१२) भरतीप्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाब तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रदद करण्यात येईल.

१३) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार पदे कमी जास्त करणे, भरती प्रक्रिया रदद करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे,इ.सर्व अधिकार उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

(स्वाक्षरीत /-)
उपसंचालक, आरोग्य सेवा,
पुणे परिमंडळ, पुणे

Scanned with CamScanner